ePaper

## नेत्यांनी शरद पवारांचं बोट सोडलं तर नेता पडतो : अमोल कोल्हे



॥ वर्ष - 8 । अंक - 42 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥

# महाईन्यूज

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 18 ऑगस्ट 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत


- श्रीजेशची 16 नंबरची जर्सी निवृत्त!
- प्रो कबड्डीचे खेळाडू झाले मालामाल!
- राहुल गांधींच्या नागरिकत्वावरून वाद?
- विधानसभेच्या निवडणुकीचं बिगुल वाजलं


## कपटी आणि सावत्र भावांना जागा दाखवा

# पुन्हा सत्तेत आल्यास मदत दुप्पट!

### ‘लाडक्या बहिणीं’ना तीन हजार ; मुख्यमंत्री शिंदे यांची घोषणा

। पुणे । महाईन्यूज

**आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीला साथ दिली, तर ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेची रक्कम दरमहा दीड हजार रुपयांवरून तीन हजार रुपये केली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. या योजनेला खोडा घालणाऱ्यांना आम्ही पुरून उरलो आहोत. अशा कपटी आणि सावत्र भावांना जागा दाखवा, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.**



महिला आणि बालकल्याण विभागाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या ‘मुख्यमंत्री लाडकी बहीण’ योजनेचा वचनपूर्ती कार्यक्रम बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी मुख्यमंत्री शिंदे बोलत होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे, सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, खासदार मेधा कुलकर्णी, श्रीरंग बारणे, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, की राज्यात ५० ते ६० वर्षे काँग्रेसचे सरकार होते. त्यांनी सर्वसामान्य बहिणींसाठी काहीही केले नाही. काँग्रेस सरकारच्या काळात एक रुपयाची मदत दिली, तर प्रत्यक्षात लाभार्थ्यांना केवळ १५ पैसे मिळत होते. मोदी सरकारने घेतलेल्या निर्णयामुळे योजनेची सर्व रक्कम महिलांच्या खात्यात जमा होत आहे. राज्यात महायुती सरकारने सुरू केलेल्या ‘लाडकी बहीण’ योजनेमुळे महिन्याला दीड हजार आणि वर्षाला १८ हजार रुपये बहिणींना मिळणार आहेत.

ही योजना जाहीर केल्यापासून त्यामध्ये खोडा घालण्यासाठी अनेकदा प्रयत्न करण्यात आले. ही फसवी योजना आहे, लाच देता का, भेट देता का, विकत घेता का, यांसारखे अनेक आरोप आमच्यावर करण्यात आले. पण बहिणींबद्दल बोलताना तुम्हाला लाज कशी वाटत नाही? महायुती सरकारने सुरू केलेल्या या योजनेमुळे बहिणींना आता कोणाच्या समोर हात पसरावा लागणार नाही, असेही शिंदे म्हणाले.

### सप्टेंबरपर्यंत मदत

**या योजनेंतर्गत ३१ जुलैपर्यंत आलेल्या अर्जांची छाननी करण्यात येत आहे. संबंधित बहिणींना ऑगस्टमध्ये मदत देण्यात येईल. ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज करणाऱ्या बहिणींना दोन महिन्यांचे तीन हजार रुपये सप्टेंबरमध्ये दिले जातील. आता दर महिन्याला बहिणींना पंधराशे रुपयांची रक्कम ही ‘माहेरचा आहेर’ म्हणून मिळणार आहे. विरोधकांसाठी ही रक्कम किरकोळ आहे. मात्र, सोन्याचा चमचा घेऊन जन्माला येणाऱ्यांना या पंधराशे रुपयांचे मोल काय कळणार, असा टोलाही मुख्यमंत्र्यांनी लगावला.**

### पूर्वीच्या सरकारकडून अनेक योजना बंद

**महायुती सरकारने समाजातील प्रत्येक घटकातील नागरिकांसाठी योजना सुरू केलेल्या आहेत. मात्र महाविकास आघाडीचे सरकार आल्यावर या सर्व योजना बंद केल्या जातील, अशी भीती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली. मुख्यमंत्री असताना आपण सुरू केलेल्या अनेक योजना महाविकास आघाडीने सत्तेत आल्यानंतर बंद केल्याचा आरोपही फडणवीस यांनी केला.**

## मोदी सरकारकडून पुणेकरांना मोठं गिफ्ट!

### आता तासांचा प्रवास मिनिटांत; 2,954 कोटींच्या मेट्रो प्रकल्पाला मंजुरी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पुणे मेट्रोच्या टप्पा-१ चा विस्तारित मार्ग स्वारगेट ते कात्रज दरम्यानच्या भुयारी मेट्रोला शुक्रवारी केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. या ५.४६ किमीच्या मार्गासाठी



२,९५४ कोटी रुपये खर्च अपेक्षित असून, पुढील पाच वर्षांत हे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट केंद्र सरकारने ‘महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन’ला (महामेट्रो) दिले आहे. ‘महामेट्रो’च्या पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट या मेट्रो ‘मार्गिका-१’चा विस्तार अनुक्रमे निगडी आणि कात्रजपर्यंत करावा, अशी मागणी सातत्याने केली जात होती. त्यापैकी पिंपरी-चिंचवड ते निगडी दरम्यानच्या विस्तारित मार्गाचे काम नुकतेच सुरू झाले आहे.

### हा मार्ग का महत्त्वाचा?

-- कात्रजहून स्वारगेट, मध्यवर्ती शहर, कोथरूड, रामवाडी असा सर्व भाग जोडला जाणार

-- कात्रजच्या आसपासच्या परिसरातील नागरिकांना पिंपरी-चिंचवड, निगडीपर्यंत जाणे शक्य

-- हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो मार्गिका सुरू झाल्यानंतर त्याचा फायदा कात्रजच्या नागरिकांना होणार

# कॅम्पातील बर्गर किंगच पुण्यात किंग!

## बर्गर किंग कॉर्पोरेशनचा दावा जिल्हा न्यायालयाने फेटाळला

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**ण्यातील लष्कर भागातील ‘बर्गर किंग’कडून अमेरिकेतील बर्गर किंग कॉर्पोरेशच्या व्यापरचिन्ह, तसेच नावाचा गैरवापर करण्यात आला नाही. बर्गर किंग कायदेशीर आणि प्रामाणिकपणे व्यवसाय करत असल्याचे निरीक्षण न्यायालायने नोंदवून बर्गर किंग कॉर्पोरेशनने दाखल केलेला दावा निकाली काढला.**




लष्कर भागातील बर्गर किंगने अमेरिकेतील बर्गर किंग कॉर्पोरेशनविरुद्ध गेले १३ वर्षे सुरू असलेली न्यायालयीन लढाई जिंकली.समान नावावरुन लष्कर भागातील बर्गर किंग आणि अमेरिकेतील बर्गर किंग कॉर्पोरेशन यांच्यात वाद होता. अमेरिकेतील बर्गर किंग कॉर्पोरेशनने दाखल केलेल्या खटल्यात जिल्हा न्यायाधीश सुनील वेदपाठक यांनी बर्गर किंगच्या बाजूने निकाल दिला. अमेरिकेच्या बर्गर किंग कॉर्पोरेशनने भारतातील प्रतिनिधी पंकज पाहुजा यांच्यामार्फत कोरेगाव पार्क आणि लष्कर भागातील ‘मेसर्स बर्गर किंग’चे मालक अनाहिता आणि शापूर इराणी यांच्याविरुद्ध दिवाणी दावा दाखल केला होता. व्यापारचिन्ह उल्लंघन, नुकसान भरपाई, पुण्याच्या बर्गर किंगला व्यापार चिन्हाच्या (ट्रेड मार्क) वापरावर कायमस्वरूपी मनाई, अशा प्रतिबंधक आदेशांसाठी अमेरिकेच्या बर्गर किंगकडून दावा दाखल करण्यात आला होता. यात ‘बर्गर किंग’च्यावतीने ॲड. ए. डी. सरवटे, ॲड. सृष्टी आंगणे आणि ॲड. राहुल परदेशी यांनी बाजू मांडली.अमेरिकेतील फ्लोरिडा राज्यात बर्गर किंग कॉर्पोरेशन कंपनीची स्थापना १९५४ मध्ये जेम्स मॅक्लामोर आणि डेव्हिड एडगर्टन यांनी स्थापन केली होती. त्यांनी ‘बर्गर किंग’ नावाने हॉटेल सुरू केले होते. या साखळी उपाहारगृह उद्योगाच्या अमेरिकेसह जगभरात शंभराहून अधिक देशांत १३ हजार शाखा आहेत. ‘बर्गर किंग’ हे व्यापार चिन्ह आणि व्यावसायिक नाव १९५४ पासून ते वापरत आहेत. या कंपनीने २०१४ पासून नवी दिल्लीत आणि नंतर मुंबई आणि पुण्यात उपाहारगृह सुरू केली. कंपनीला २००८ मध्ये पुण्यात सारख्याच नावाने आधीच एक उपहारगृह सुरू केल्याची माहिती मिळाली. त्यामुळे अमेरिकेच्या कंपनीने जून २००९ मध्ये आपल्या वकिलांमार्फत पुण्यातील ‘बर्गर किंग’ला आपला व्यवसाय थांबवण्याची नोटीस बजावून सामंजस्याने हे प्रकरण मिटविण्याचा प्रस्ताव दिला होता. मात्र, या प्रकरणात तडजोड झाली नाही.लष्कर भागातील बर्गर किंगने अमेरिकेतील बर्गर किंग कॉर्पोरेशनविरुद्ध गेले १३ वर्षे सुरू असलेली न्यायालयीन लढाई जिंकली.समान नावावरुन लष्कर भागातील बर्गर किंग आणि अमेरिकेतील बर्गर किंग कॉर्पोरेशन यांच्यात वाद होता. अमेरिकेतील बर्गर किंग कॉर्पोरेशनने दाखल केलेल्या खटल्यात जिल्हा न्यायाधीश सुनील वेदपाठक यांनी बर्गर किंगच्या बाजूने निकाल दिला. अमेरिकेच्या बर्गर किंग कॉर्पोरेशनने भारतातील प्रतिनिधी पंकज पाहुजा यांच्यामार्फत कोरेगाव पार्क आणि लष्कर भागातील ‘मेसर्स बर्गर किंग’चे मालक अनाहिता आणि शापूर इराणी यांच्याविरुद्ध दिवाणी दावा दाखल केला होता. व्यापारचिन्ह उल्लंघन, नुकसान भरपाई, पुण्याच्या बर्गर किंगला व्यापार चिन्हाच्या अमेरिकेच्या बर्गर किंगकडून दावा दाखल करण्यात आला होता.

### देशांत 13 हजार शाखा

यात ‘बर्गर किंग’च्यावतीने ॲड. ए. डी. सरवटे, ॲड. सृष्टी आंगणे आणि ॲड. राहुल परदेशी यांनी बाजू मांडली.अमेरिकेतील फ्लोरिडा राज्यात बर्गर किंग कॉर्पोरेशन कंपनीची स्थापना १९५४ मध्ये जेम्स मॅक्लामोर आणि डेव्हिड एडगर्टन यांनी स्थापन केली होती. त्यांनी ‘बर्गर किंग’ नावाने हॉटेल सुरू केले होते. या साखळी उपाहारगृह उद्योगाच्या अमेरिकेसह जगभरात शंभराहून अधिक देशांत १३ हजार शाखा आहेत. ‘बर्गर किंग’ हे व्यापार चिन्ह आणि व्यावसायिक नाव १९५४ पासून ते वापरत आहेत.

# उत्सवातील कोंडी हटविण्यासाठी मंडळांच्या कार्यकर्त्यांची मदत

## कार्यकर्ते वाहतूक स्वयंसेवकांच्या भूमिका बजाविणार

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गणेशोत्सवात होणारी कोंडी हटविण्यासाठी मंडळाचे कार्यकर्ते मदत करणार आहेत. मंडळाचे कार्यकर्ते वाहतूक स्वयंसेवकांच्या भूमिका बजाविणार आहेत. पुणे पोलिसांच्या परिमंडळ एककडून गणेशोत्सव कार्यकर्त्यांची बैठक शनिवारी आयोजित करण्यात आली. बैठकीत विविध मंडळांचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. पोलीस उपायुक्त संदीपसिंग गिल यावेळी उपस्थित होते.**



शहराच्या मध्यभागात मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्यात येतो. प्रमुख मानांची मंडळे मध्यभागात आहेत. उत्सवाच्या कालावधीत राज्यासह, देशाच्या वेगवेगळ्या भागातून भाविक मध्यभागात गर्दी करतात. भाविकांची होणारी गर्दी, तसेच वाहतूक नियोजन करण्यासाठी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांशी पोलीस उपायुक्त गिल यांनी संवाद साधला. मंडळाचे कार्यकर्त्यांनी उत्सव कालावधीत वाहतूक नियोजन करण्यासाठी पोलिसांना सहाय करावे, असे आवाहन पोलीस उपायुक्त गिल यांनी बैठकीत केले. त्यानुसार विविध मंडळांच्या कार्यकर्ते वाहतूक नियोजनासाठी सहाय्य करणार आहेत.

उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी पोलिसांकडून विविध यंत्रणांशी समन्वय साधण्यात येणार आहे. महावितरणशी संपर्क साधण्यात आला आहे. विद्युत तारांची देखभाल ठेवण्यात यावी, तसेच लटकणाऱ्या विद्युत तारा व्यवस्थित कराव्यात, अशा सूचना देण्यात आल्या. गणेश मंडळे, ढोल पथक, पोलीस, स्वयंसेवक यांच्यात समन्वय असणे गरजेचे असल्याचे पोलीस उपायुक्त गिल यांनी नमूद केले. अनेक गणेश मंडळांसाठी समन्वय अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात येणार असल्याचे बैठकीत निश्चित करण्यात आले.

### ढोल पथकांमधील सदस्यांची संख्या निश्चित

गेल्या वर्षी मंडळाच्या मिरवणुकीत ढोल पथकात ५० ढोल आणि १० ताशा अशी संख्या निश्चित करण्यात आली होती. मिरवणुकीत पथकांची संख्या मर्यादित ठेवावी, अशी सूचना करण्यात आली.

# नाशिक फाटा ते मोशी अंतरावर तीन 'जंक्शन-सब-वे'!

## 'एलिव्हेटेड कॉरिडॉर'च्या प्रकल्पाबाबत अधिकाऱ्यांची माहिती

### आमदार महेश लांडगे, आयुक्त शेखर सिंह अन् 'एनएचएआय'ची बैठक

। पिंपरी।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**नाशिक फाटा ते खेड दरम्यान एलिव्हेटेड कॉरिडॉरचे काम सुरू झाल्यानंतर शहरातील सर्वसामान्य पिंपरी-चिंचवडकरांना वाहतूक कोंडीचा त्रास होवू नये. या करिता कामाच्या पहिल्या टप्प्यात जय गणेश साम्राज्य स्पाईन रोड, भारतमाता चौक मोशी आणि भोसरी येथील वाहतुकीला अडथळा होवू नये या करिता तीनही प्रस्तावित जक्शन व सब-वेचे काम प्राधान्याने हाती घ्यावे, अशी सक्त सूचना भाजपा आमदार महेश लांडगे यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला दिली आहे.**

पुणे-नाशिक महामार्गावरील नाशिक फाटा ते खेड ८ पदरी एलिव्हेटेड कॉरिडॉरला केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या सकारात्मक पुढाकारामुळे या प्रकल्पासाठी सुमारे ७ हजार ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या संदर्भातील प्रकल्पाची माहिती देण्याकरिता महापालिका भवन येथे बैठक घेण्यात आली.

यावेळी महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे नाशिक फाटा ते खेड एलिव्हेटेड कॉरिडॉर प्रोजेक्ट मॅनेजर संजय कदम, मुख्य अभियंता श्रीकांत सवणे, सहशहर अभियंता प्रमोद ओंबासे, कार्यकारी अभियंता बापुसाहेब गायकवाड यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.



### भैरवनाथ स्कूलजवळ अंडरपासची सूचना...

प्रकल्पाची निविदा प्रक्रिया सुरू झाली असून, कामाला गती देण्यासाठी महानगरपालिका, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांची संयुक्त बैठक घेण्यात आली. यावेळी NHAI च्या अधिकाऱ्यांनी प्रकल्पाचे सादरीकरण केले. भोसरी, तळवडे, चिखली, मोशी याभागातील वाहतूक सक्षम होण्याच्या दृष्टीने अंडरपास आणि सब-वे तसेच, भोसरीत भैरवनाथ हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज या ठिकाणी विद्यार्थी-पालकांच्या सोयीकरिता अंडरपासची व्यवस्था करावी, अशी सूचना आमदार महेश लांडगे यांनी प्रशासनाला केली आहे.



"नाशिक फाटा ते खेड या ३२ किलोमीटर लांबीच्या एलिव्हेटेड कॉरिडॉरमुळे पुणे, पिंपरी-चिंचवडसह चाकण औद्योगिक पट्ट्यातील प्रमुख आर्थिक केंद्रांना जोडणारा दुवा निर्माण होणार आहे. या प्रकल्पामुळे नाशिक फाटा ते खेड अंतर अगदी काही मिनिटात पार करता येईल. तसेच, शहरातील तळवडे-चिखली-मोशी- भोसरी परिसरातील "ट्रॅफिक कोंडी" कायमची सुटणार आहे. काम सुरू असतानाही नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागू नये. या करिता प्रशासनाने सर्व उपाययोजना कराव्यात, अशी सूचना केली आहे.

– **महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

---

# शाळांच्या दैनंदिन साफसफाई कामात 'रिंग'?

## शिवसेना नेत्या सुलभा उबाळे यांच्याकडून 'पोलखोल'

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पुणे जिल्हा संघटिका सुलभा उबाळे यांनी पिंपरी चिंचवड महापालिकेतील मोठी पोलखोल केली आहे. भाजप नेत्याशी संबंधित एका ठेकेदार कंपनीने दुसऱ्या कंपनीला हाताशी धरून पालिकेतील शाळांच्या दैनंदिन सफाई कामात "रिंग" केली असल्याचा गंभीर प्रकार उबाळे यांनी उघडकीस आणला आहे. या ठेकेदाराने अशाच प्रकारचा कारनामा बृहन्मुंबई महापालिकेत देखील केला होता. रिंग करून इतर ठेकेदारांना निविदा भरू दिली जात नसल्याचे समजते. आता असाच प्रकार शाळांच्या दैनंदिन साफसफाई कामात झाला असल्याचे उबाळे यांनी पुराव्यानिशी समोर आणले आहे. यावर तातडीने ठोस निर्णय घेऊन गैरप्रकार न थांबवल्यास न्यायालयात जाण्याचा इशारा देखील उबाळे यांनी दिला आहे.**



शनिवारी पिंपरी येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत सुलभा उबाळे बोलत होत्या. यावेळी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते संजोग वाघेरे पाटील, शहर प्रमुख ॲड. सचिन भोसले, माजी आमदार ॲड. गौतम चाबुकस्वार, युवा सेना शहर अधिकारी चेतन पवार, युवा सेना जिल्हा अधिकारी सचिन सानप, माजी नगरसेवक धनंजय आल्हाट, अनंत कोऱ्हाळे, शहर संघटक संतोष वाळके, तुषार सहाने, भोसरी विधानसभा समन्वयक दादा नरळे आदी उपस्थित होते. यावेळी सुलभा उबाळे यांनी म्हटले की, पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शिक्षण विभागाच्या प्राथमिक व माध्यमिक शाळेची यांत्रिकीकरणाद्वारे दैनंदिन साफसफाई करण्यात येणार आहे. दैनंदिन साफसफाई कामासाठी सहा कंपन्यांनी निविदा प्रक्रियेत सहभाग घेतला. मात्र क्रिस्टल व ब्रिक्स वगळता चार कंपन्यांना अपात्र ठरविण्यात आले. ज्या दोन कंपन्यांना पात्र केले आहे त्यांनी निविदेपेक्षा जास्त दर भरलेले आहेत. त्यामुळे क्रिस्टल कंपनी ने ब्रिक्स कंपनीला हाताशी धरून रिंग केली असल्याचा गंभीर आरोप उबाळे यांनी केला आहे.

पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना याबाबत उबाळे यांनी निवेदन केले आहे. त्यांनी म्हटले आहे, पालिकेच्या शिक्षण विभागाच्या दैनंदिन साफसफाई कामासाठी निविदा प्रक्रिया राबवण्यात आली. यासाठी सहा कंपन्यांनी निविदा प्रक्रियेत सहभाग घेतला होता. या निविदेमध्ये अटी शर्ती ठराविक कंपन्यांना डोळ्यासमोर ठेऊन करण्यात आल्या आहेत. निविदा काढून पाच महिने झाल्यानंतर ही त्यावरील निर्णय प्रलंबित ठेवण्यात आला. त्याकाळात निविदेत सहभागी असणाऱ्या व पात्र असणाऱ्या इतर ठेकेदारांना कसे अपात्र करता येईल याबद्दल कटकारस्थान करण्यात आले असा आरोप उबाळे यांनी केला आहे. क्रिस्टल कंपनीचे डायरेक्टर हे भाजपचे नेते प्रसाद लाड यांचे जवळचे नातेवाईक आहेत. ब्रिक्स कंपनीचे डायरेक्टर चंद्रकांत गायकवाड हे पुण्याच्या पालकमंत्र्यांचे, त्यांच्या मुलाचे नाव घेत अधिकाऱ्यांशी खासगीत बोलतात. पालिका प्रशासनात दबक्या आवाजात याची चर्चा सुरू आहे.

### ढोल पथकांमधील सदस्यांची संख्या निश्चित

आयुक्त वाढीव दराने काम देणार का? दोनच निविदा धारक पात्र केल्यामुळे यावर शिक्कामोर्तब होत आहे कि हे काम ब्रिक्स कंपनीला वाढीव दराने मिळणार आहे. यामुळे पालिकेचे आर्थिक नुकसान होणार आहे. त्यामुळे इतर कंपन्यांना कठोर नियम लावण्याचे कारण काय आयुक्तांनी स्पष्ट करावे. ज्या ठेकेदार कंपन्यांचे काम सुरू आहे त्यांना पात्र करावे किंवा नवीन टेंडर काढावे. प्रशासक असताना असा कारभार सुरू आहे. त्यामुळे सर्व विभागातील कामकाज तपासावे लागेल. आयुक्तांनी प्रशासक म्हणून काम करत असताना अश्या प्रकारच्या जनतेच्या कररूपी पैशाचे नुकसान करू नये व हि निविदा रद्द करावी अन्यथा पात्र अपात्रतेची पडताळणी करून सर्व निविदाधारकांच्या निविदा उघडण्यात याव्यात व जनतेच्या पैशाची लूट थांबवावी. यावर ठोस निर्णय घ्यावा अन्यथा न्यायालयाचे दरवाजे ठोठावे लागतील असे सुलभा उबाळे यांनी म्हटले आहे.

# हर घर तिरंगा, एक असंही वास्तव



## भूमिका

- हर्षल आल्पे
+91 97638 92199

**नुकतेच भारताच्या 78 व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त सगळीकडे उत्साहाने आपला भारताचा तिरंगा डौलाने सगळीकडे फडकत होता. यानिमित्ताने एक मोहीमही खूप जोरात चालू असल्याचे कळत होते. 'हर घर तिरंगा'या मोहिमेची जाहिरात साधारण 12/13 तारखेपासून सुरू करण्यात आली होती.**



सगळीकडे याबाबतीत मोठ्या प्रमाणावर खूप उत्साह दिसत होता. मी आणि आमचे कुटुंबीयही प्रचंड जात होतो, आहोत आणि यापुढेही राहू. पण, जाहिरातीतील एक गोष्ट लक्षात घेऊन आम्ही आमच्या जवळच्या म्हणजेच तळेगाव दाभाडे येथील जवळच्या पोस्ट ऑफिस मध्ये हा तिरंगा झेंडा विकत घ्यायला गेलो तेव्हा मात्र फारच विचित्र अनुभव आला. 14 तारखेला सकाळी तिथे गेलो असता आम्हाला दुपारी येण्याचा सल्ला मिळाला. पुन्हा दुपारी तीन सव्वातीन च्या आसपास गेलो असताना तिथे असलेल्या अधिकाऱ्याने आमचं काहीही न ऐकून घेता थेटपणे झेंड्याचे नाव घेतल्यावर,'शॉप मे जाओ'असं सांगितलं गेलं. त्यांच्या या वक्तव्यावर क्षणभर आम्हाला काही कळलंच नाही. म्हणून आम्ही पुन्हा त्यांना विचारले. तेव्हा त्यांनी थंडपणे 'झंडा खरीदने शॉप मे जाओ यहा नही मिलता है'असं सांगत होता. मग आम्ही संतापलो. कारण जाहिरातीत आपल्या जवळच्या पोस्ट ऑफिसला आपल्याला तिरंगा झेंडा अत्यंत माफक दरात मिळेल असं सांगितलं जात होतं. आणि इथे मात्र झेंडा घेण्यासाठी दुकानात जा असं सांगत होते. आम्ही विचारलं की इथे आलेले संपले का? त्याच्यावर त्यांनी उदामपणे काहीही प्रतिक्रिया दिली नाही आणि आम्हाला दरवाजा दाखवला. ही अत्यंत निषेधार्ह गोष्ट आहे. त्यानंतर आम्ही एका दुकानातून जाहिरातीत केलेल्या दाव्याप्रमाणे पोस्टात ज्या दरात मिळेल, असं सांगितलं जात होतं, त्याच्यापेक्षा तब्बल पाचपट दर देऊन आम्ही हा झेंडा विकत घेतला.

आमची इच्छा होती 'हर घर तिरंगा'ती अत्यंत महत्त्वाची मोहीम आहे. आणि आणि आपल्या देशाविषयी कृतज्ञता आपण व्यक्त केलीच पाहिजे. तशी रोजच केली पाहिजे, मात्र आपला तिरंगी झेंडा आपल्या घरावर फडकवून आपल्या मनातील देशभक्ती अधिक दृढ करण्यासाठीचा हा फक्त मार्ग होता. मात्र या सगळ्या उत्साहाला पोस्ट खात्याने विशेषतः तळेगावातील पोस्ट ऑफिस मधील त्या उद्दाम अधिकाऱ्याने याच्यावर गालबोट लावण्याचा प्रयत्न केला. खरंतर पोस्ट खात्याने याबाबतीत उत्साह दाखवला पाहिजे. त्यांचीही नैतिक जबाबदारी आहे. इतकेच

धन्यवाद.

## प्रासंगिक »

### तू जन्मूच नकोस...

***उद्विग्नता, हताशा घेऊन मोर्चे काढायचे आणि तिच्या जागी आपली लेक नव्हती याचे समाधान मानायचे?***

बलात्कार आणि क्रूर हत्या यांची बळी ठरलेल्या कोलकात्यातील डॉक्टर तरुणीपेक्षा आईच्या गर्भातच स्त्रीभ्रूणहत्येला सामोऱ्या जाणाऱ्या मुली किती तरी नशीबवान म्हणायच्या. होय... मुली, स्त्रिया यांच्या बाबतीत घडणाऱ्या क्रौर्याची प्रतवारी करायची तर ती अशीच करावी लागेल. या जगात येऊन कुणाची तरी लाडकी लेक, लाडकी बहीण, लाडकी नात, पुतणी, भाची, मैत्रीण, बायको होऊनही कुणा वासनांधाच्या विकृतीची शिकार होण्यापेक्षा जन्मण्याच्या आधीच काय तो मृत्यू आलेला कधीही चांगला. काळजाचा तुकडा असलेल्या लेकीला प्रेमाने, लाडाकोडात वाढवण्याची, शिकवण्याची, हवे ते सगळे मिळवून देण्याची इच्छा बाळगणाऱ्या आईबापांना एके काळी हुंडा नावाच्या छुप्या, पण भयंकर राक्षसाची दहशत होती. त्याची भीती बाळगत जगण्यापेक्षा 'पापा की परी' जन्माला न आलेलीच बरी, असे कोणत्याही आईबापांना आजघडीला वाटत असेल तर त्यात काय चुकीचे आहे?

घोड्याला पाण्यापर्यंत नेता येते, पण पाणी त्याचे त्यालाच प्यावे लागते. प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत आपल्या व्यवस्थेचे वर्तन या पाणी पिण्याचेही कष्ट घेण्यास तयार नसलेल्या घोड्यासारखे होते. तब्बल एक शतकभर सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची अंमलबजावणी करण्यात अक्षम्य टाळाटाळ करण्यात आली.

# शिक्षण हक्काचे सार आपल्याला समजलेच नाही!

आता शिक्षण हक्क कायदा संमत होऊन एक दशक लोटले, तरीही त्याच्या काटेकोर अंमलबजावणीत चालढकलच सुरू आहे. संसदेने संमत केलेला शालेय शिक्षणाविषयीचा हा पहिलाच आणि ऐतिहासिक कायदा होता. तो संमत होणे हे कोट्यवधी विद्यार्थ्यांसाठी आश्वासक पाऊल होते. भारताच्या सामाजिक इतिहासात एक नवा अध्याय सुरू होणार होता. विविध राज्यांतील नियम आणि अंमलबजावणीच्या स्वरूपात तफावत असली, तरीही सुरुवातीला भविष्य उज्ज्वल असल्याच्या आशा पल्लवीत झाल्या होत्या. प्राथमिक शिक्षण आणि इतर बाल हक्कांना अखेर सामाजिक मान्यता मिळाल्याचे आनंददायी चित्र स्पष्ट दिसू लागले होते.मात्र पुढे विविध राज्यांतील सरकारांनी शिक्षण हक्काची वाट भरकटवण्यासाठी कसे डाव खेळले हे मुंबई उच्च न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या निकालातून अधोरेखित झाले. राज्य सरकारने वर्षाच्या सुरुवातीला दिलेला आदेश




न्यायालयाने रद्दबातल ठरविला. या आदेशान्वये आर्थिकदृष्ट्या दुर्बळ गटातील विद्यार्थ्यांना शिक्षण हक्क नाकारण्याचा प्रयत्न या करण्यात आला होता. या कायद्यातील एका महत्त्वाच्या तरतुदीला बगल देण्याचा हा डाव होता. या आदेशाच्या माध्यमातून शिक्षण हक्काअंतर्गत विनाअनुदानीत खासगी शाळांतील एक चतुर्थांश जागा राखीव ठेवण्याची अट आडवाटेने रद्द करण्यात आली होती. ज्या खासगी शाळांच्या एक किलोमीटर परिघात सरकारी शाळा असेल, त्या शाळांवर शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी करण्याची सक्ती असणार नाही, असे राज्य सरकारच्या आदेशात नमूद करण्यात आले होते. जिथे नोकशाहीने अशी नामी शक्कल लढविली, असे महाराष्ट्र हे एकमेव राज्य नव्हते. सरकारने या आदेशाच्या समर्थनार्थ दोन प्रतिवाद केले. पहिला होता संसाधनांविषयीचा. सरकारी शाळांत सहज प्रवेश मिळतच असेल, तर खासगी शाळांत त्याचीच पुनरावृत्ती कशासाठी? मात्र या प्रतिवादामागे एक आर्थिक कारण दडलेले होते. ज्या खासगी शाळा शिक्षण हक्काअंतर्गत प्रवेश देतात, त्यांना सरकारकडून आर्थिक मोबदला दिला जातो. सरकारच्या प्रतिवादाची पाळेमुळे मुद्द्यात होती. सरकारला प्रत्येक विद्यार्थ्याच्या शिक्षणशुल्काची पूर्ण रक्कम द्यावी लागत नसे, सरकारी शाळांत प्रत्येक विद्यार्थ्यावर जेवढी रक्कम खर्च केली जाते, तेवढीच रक्कम खासगी शाळांना दिली जात असे. खासगी शाळांसाठी तोट्याचा व्यवहार होता. सरकारचा खर्चाच्या पुनरावृत्तीचा दावा या नियमाशी संबंधीत आहे.दुसरा प्रतिवाद खुद्द शिक्षण हक्क कायद्याविषयी होता.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# अजित पवारांबरोबर नाईलाजाने गेलो!

## आजही मी शरद पवारांना नेता मानतो : आमदार राजेंद्र शिंगणे

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**विधानसभेची निवडणूक दोन महिन्यांमध्ये जाहीर होण्याची शक्यता आहे. निवडणूक तोंडावर आल्यामुळे आता सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी कंबर कसली आहे. सध्या नेत्यांचे महाराष्ट्रभर दौरे सुरु आहेत. या दौऱ्यांच्या माध्यमातून विविध मतदारसंघात सभा, मेळावे आणि आढावा बैठका घेतल्या जात आहेत. तसेच विधानसभा निवडणुकीची रणनीती आखली जात आहे. यातच सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपाच राजकारण सुरु आहे. त्यामुळे महाराष्ट्रात राजकारण चांगलंच तापलेलं आहे.**



अशातच काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटातील नेत्यांकडून एकमेकांचे आमदार संपर्कात असल्याचा दावाही केला आहे. असं असतानाच आज राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार राजेंद्र शिंगणे यांनी मोठं विधान केलं आहे. “मी अजित पवार यांच्याबरोबर नाईलाजाने गेलो”, असं राजेंद्र शिंगणे यांनी माध्यमांशी बोलताना म्हटलं. याचवेळी राजेंद्र शिंगणे यांनी शरद पवारांचंही तोंडभरुन कौतुक करत आजही मी शरद पवारांना नेता मानतो, असंही म्हटलं आहे. त्यांच्या या विधानानंतर राज्याच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. “गेली अनेक वर्षे मी शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली काम करतोय. माझ्या राजकीय जडणघडणीमध्ये देखील शरद पवार यांचा मोठा मोलाचा वाटा असल्याचंही मी मान्य करतो. त्यामुळे मी आयुष्यभर निश्चितपणे त्यांचा ऋणी राहणार आहे. मात्र, मध्यंतरीच्या काळात आमच्या जिल्हा सहकारी बँकेच्या अडचणीमुळे मी नाईलाजाने अजित पवार यांच्याबरोबर गेलो. त्यानंतर आज राज्य सरकारने जिल्हा सहकारी बँकेला ३०० कोटी रुपये दिले. परंतु निश्चितपणे शरद पवार माझ्यासाठी आदरणीय राहतील”, असं आमदार राजेंद्र शिंगणे यांनी म्हटलं आहे. आमदार शिंगणे पुढे म्हणाले की, “मी राष्ट्रवादी अजित पवार गटामध्ये सहभागी झालो असलो तरी गेल्या दोन ते अडीच वर्षात शरद पवार यांच्याबरोबरील संबंध तोडले असा काही भाग नाही. आजही मी शरद पवार यांना नेता मानतो. गेल्या दोन वर्षात जाहीर भाषणात असेल किंवा वैयक्तिक बोलतानाही शरद पवार यांचं नाव मी राज्यातील मोठे नेते आणि लोकनेते असंच घेत आलो. भविष्यात देखील शरद पवार यांचं नेतृत्व राज्याला आणि देशाला आश्वासकच राहणार आहे”, असंही राजेंद्र शिंगणे यांनी म्हटलं आहे. राजेंद्र शिंगणे हे सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघाचे आमदार आहेत. अजित पवार महायुतीमध्ये सहभागी झाल्यानंतर राजेंद्र शिंगणे यांनीही अजित पवारांची साथ दिली. राजेंद्र शिंगणे हे सध्याही अजित पवार गटात आहेत. मात्र, आज त्यांनी केलेल्या विधानंतर ते अजित पवारांची साथ सोडणार का? याबाबत आता राजकीय वर्तुळात तर्कवितर्क लावले जात आहेत.अशातच काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटातील नेत्यांकडून एकमेकांचे आमदार संपर्कात असल्याचा दावाही केला आहे. असं असतानाच आज राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार राजेंद्र शिंगणे यांनी मोठं विधान केलं आहे. “मी अजित पवार यांच्याबरोबर नाईलाजाने गेलो”, असं राजेंद्र शिंगणे यांनी माध्यमांशी बोलताना म्हटलं. याचवेळी राजेंद्र शिंगणे यांनी शरद पवारांचंही तोंडभरुन कौतुक करत मी शरद पवारांना नेता मानतो, असंही म्हटलं आहे. राज्याच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. “गेली अनेक वर्षे मी शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली काम करतोय. माझ्या राजकीय जडणघडणीमध्ये देखील शरद पवार यांचा मोठा मोलाचा वाटा असल्याचंही मी मान्य करतो. त्यामुळे मी आयुष्यभर निश्चितपणे त्यांचा ऋणी राहणार आहे. मात्र, मध्यंतरीच्या काळात आमच्या जिल्हा सहकारी बँकेच्या अडचणीमुळे मी नाईलाजाने अजित पवार यांच्याबरोबर गेलो. त्यानंतर आज राज्य सरकारने जिल्हा सहकारी बँकेला ३०० कोटी रुपये दिले. परंतु निश्चितपणे शरद पवार माझ्यासाठी आदरणीय राहतील

### मी शरद पवार यांना नेता मानतो

“मी राष्ट्रवादी अजित पवार गटामध्ये सहभागी झालो असलो तरी गेल्या दोन ते अडीच वर्षात शरद पवार यांच्याबरोबरील संबंध तोडले असा काही भाग नाही. आजही मी शरद पवार यांना नेता मानतो. गेल्या दोन वर्षात जाहीर भाषणात असेल किंवा वैयक्तिक बोलतानाही शरद पवार यांचं नाव मी राज्यातील मोठे नेते आणि लोकनेते असंच घेत आलो. भविष्यात देखील शरद पवार यांचं नेतृत्व राज्याला आणि देशाला आश्वासकच राहणार आहे”, असंही राजेंद्र शिंगणे यांनी म्हटलं आहे.

# भास्कर जाधव मुलासाठी मतदारसंघ बदलणार?

## चिपळूण मधून विधानसभेची निवडणूक लढवण्याची शक्यता

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**शिवसेनेचे आमदार भास्कर जाधव गुहागर विधानसभा मतदारसंघाची जागा त्यांचे पुत्र विक्रांत जाधव याला सोडून ते चिपळूण मधून विधानसभेची निवडणूक लढवण्याची शक्यता आहे. यासंदर्भात सध्या राजकीय चर्चा सुरू आहे. पक्षाचे निरीक्षण आमदार मिलिंद नार्वेकर यांनी नुकतेच कोकणचा दौरा केला. यावेळी आमदार जाधव यांची आमदार नार्वेकर यांच्याशी यासंदर्भात चर्चा झाल्याचे खात्रीलायक वृत्त आहे.**

आमदार भास्कर जाधव सध्या गुहागरचे आमदार आहेत. या मतदारसंघातून त्यांनी सलग तीन वेळा विजय मिळवला आहे. नुकतेच झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांना सत्तावीस हजाराचे मताधिक्य मिळवून दिले. त्यामुळे गुहागर मध्ये महाविकास आघाडीचा घटक पक्ष असलेल्या शिवसेनेची ताकद मजबूत आहे. २००४ च्या विधानसभा निवडणुकीत भास्कर जाधव यांचा चिपळूणमध्ये पराभव झाला होता. चिपळूण मधून ते सलग दोन वेळा विजय झाले होते. तिसऱ्या वेळी त्यांचा पराभव झाला. भास्कर जाधव यांना तो



पराभवाचा डाग पुसायचा आहे. तसेच मुलगा विक्रांत याला आमदार बनवायचे आहे.माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फुटल्यानंतर राज्यात निर्माण झालेली परिस्थिती भास्कर जाधव यांना चिपळूण मधून पुन्हा जिंकण्यासाठी तसेच गुहागर मधून मुलगा विक्रांत याला आमदार बनवण्यासाठी अनुकूल वाटत आहे. त्यामुळे गुहागरची जागा ते मुलासाठी सोडणार असून ते चिपळूण मधून निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक आहेत. या संदर्भात भास्कर जाधव यांनी अधिकृतपणे आपली भूमिका व्यक्त केलेली नाही. मात्र रत्नागिरी रायगड आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघाचा आढावा घेण्यासाठी उद्धव ठाकरे यांचे विश्वासू आमदार मिलिंद नार्वेकर यांनी नुकतेच कोकणचा दौरा केला.

### नार्वेकर यांनी कोकणचा दौरा केला

त्यावेळी आमदार भास्कर जाधव यांनी गुहागरच्या आणि चिपळूणच्या जागे संदर्भात नार्वेकर यांच्याशी खाजगीत चर्चा केल्याचे सांगितले जात आहे.शिवसेनेचे आमदार भास्कर जाधव गुहागर विधानसभा मतदारसंघाची जागा त्यांचे पुत्र विक्रांत जाधव याला सोडून ते चिपळूण मधून विधानसभेची निवडणूक लढवण्याची शक्यता आहे. यासंदर्भात सध्या राजकीय चर्चा सुरू आहे. पक्षाचे निरीक्षण आमदार मिलिंद नार्वेकर यांनी नुकतेच कोकणचा दौरा केला. यावेळी आमदार जाधव यांची आमदार नार्वेकर यांच्याशी यासंदर्भात चर्चा झाल्याचे खात्रीलायक वृत्त आहे.

# सत्ताधारी -विरोधी खासदारांमध्ये हाणामारी

## सदस्यांनी हस्तक्षेप; वाद मिटवण्याचा प्रयत्नही केला

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**तुर्कस्तानच्या संसदेमध्ये सत्ताधारी पक्षाचे सदस्य आणि विरोधी पक्षाच्या सदस्यांमध्ये जोरदार हाणामारी झाल्याचं समोर आलं आहे. एका विषयावर चर्चा सुरु असताना सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील काही सदस्यांमध्ये आधी आरोप-प्रत्यारोप आणि शाब्दिक वाद झाला. मात्र, त्यानंतर सत्ताधारी पक्षाचे सदस्य आणि विरोधी पक्षाच्या सदस्यांमध्ये वाद वाढला आणि त्यांचं रुपांतर हाणामारीत झालं.**



यामध्ये अनेक खासदारांचा सहभाग दिसला तर काही सदस्यांनी हस्तक्षेप करत हा वाद मिटवण्याचा प्रयत्नही केला. या हाणामारीनंतर संसदेच्या मजल्यावर रक्त देखील दिसून आलं. दरम्यान, एका व्हिडीओमध्ये दिसून आलं की, सत्ताधारी एकेपी पक्षाचे खासदार व्यासपीठावर उभ्या असलेल्या अहमद सिकला टोला मारण्यासाठी धावले. पण लगेच दुसरे काही खासदारही या हाणामारीत सहभागी झाले.संसदेत हाणामारी सुरु असताना काही खासदारांनी रोखण्याचा प्रयत्न केला. संसदेच्या स्पीकरच्या व्यासपीठाच्यासमोरही काही ठिकाणी या हाणामारीनंतर रक्त पडलेलं दिसून आलं. संसदेत हा गदारोळ जवळपास अर्धा तास सुरु होता. या हाणामारीत दोन खासदार गंभीर जखमी झाले असल्याचं सांगण्यात येत आहे. या हाणामारीच्या घटनेनंतर संसदेचे कामकाज थांबवण्यात आलं होतं. दरम्यान ही घटना शुक्रावारी घडली. याबाबतच एक व्हिडीओही व्हायरल होत आहे.तुर्कस्तानच्या संसदेमध्ये सत्ताधारी एकेपी पक्षाचे सदस्य अल्पे ओझलान यांनी डाव्या वर्कर्स पार्टी ऑफ तुर्की (टीआयपी) चे खासदार अहमत सिक यांच्यावर हल्ला केला. यामुळे संसदेत गोंधळ निर्माण झाला. त्यानंतर विरोधी पक्षांनी सरकारच्या वागणुकीचा निषेध केला. दरम्यान, तुर्कस्तानच्या संसदेत शुक्रवारी एक बैठक होत होती. यामध्ये खासदार काईन अटाले यांच्याविषयी चर्चा सुरु होती. खासदार काईन अटाले हे गेल्या काही महिन्यांपासून तुरुंगात आहेत. त्यांनी सरकारच्या विरोधात केलेल्या निदर्शनादरम्यान खूप हिंसाचार झाला होता. त्यानंतर त्यांना अटक करण्यात आली होती. तेव्हापासून ते तुरुंगात आहेत. मात्र, त्यानंतर झालेल्या निवडणुकीत अटाले हे डाव्या टीआयपी पक्षातून निवडून आले होते. मात्र, सरकारने अटाले यांचे संसदेचे सदस्यत्व नाकारणारे विधेयक मांडले होते, त्यावरून सत्ताधारी पक्षाचे सदस्य आणि विरोधी पक्षाचे सदस्य आमने-सामने आले आणि त्यांच्यामध्ये हाणामारी झाली.यामध्ये अनेक खासदारांचा सहभाग दिसला तर काही सदस्यांनी हस्तक्षेप करत हा वाद मिटवण्याचा प्रयत्नही केला. या हाणामारीनंतर संसदेच्या मजल्यावर रक्त देखील दिसून आलं. दरम्यान, एका व्हिडीओमध्ये दिसून आलं की, सत्ताधारी एकेपी पक्षाचे खासदार व्यासपीठावर उभ्या असलेल्या अहमद सिकला टोला मारण्यासाठी धावले. पण लगेच दुसरे काही खासदारही या हाणामारीत सहभागी झाले. संसदेत हाणामारी सुरु असताना काही खासदारांनी रोखण्याचा प्रयत्न केला. संसदेच्या स्पीकरच्या व्यासपीठाच्यासमोरही काही ठिकाणी या हाणामारीनंतर रक्त पडलेलं दिसून आलं. संसदेत हा गदारोळ जवळपास अर्धा तास सुरु होता. या हाणामारीत दोन खासदार गंभीर जखमी झाले असल्याचं सांगण्यात येत आहे. या हाणामारीच्या घटनेनंतर संसदेचे कामकाज थांबवण्यात आलं होतं. दरम्यान ही घटना शुक्रावारी घडली. याबाबतच एक व्हिडीओही व्हायरल होत आहे.तुर्कस्तानच्या संसदेमध्ये सत्ताधारी एकेपी पक्षाचे सदस्य अल्पे ओझलान यांनी डाव्या वर्कर्स पार्टी ऑफ तुर्की (टीआयपी) चे खासदार अहमत सिक यांच्यावर हल्ला केला. यामुळे संसदेत गोंधळ निर्माण झाला. त्यानंतर विरोधी पक्षांनी सरकारच्या वागणुकीचा निषेध केला. दरम्यान, तुर्कस्तानच्या संसदेत शुक्रवारी एक बैठक होत होती. यामध्ये खासदार काईन अटाले यांच्याविषयी चर्चा सुरु होती. खासदार काईन अटाले हे गेल्या काही महिन्यांपासून तुरुंगात आहेत.

### आरोप-प्रत्यारोप आणि शाब्दिक वाद

त्यांनी सरकारच्या विरोधात केलेल्या निदर्शनादरम्यान खूप हिंसाचार झाला होता. त्यानंतर त्यांना अटक करण्यात आली होती. तेव्हापासून ते तुरुंगात आहेत. मात्र, त्यानंतर झालेल्या निवडणुकीत अटाले हे डाव्या टीआयपी पक्षातून निवडून आले होते. मात्र, सरकारने अटाले यांचे संसदेचे सदस्यत्व नाकारणारे विधेयक मांडले होते, त्यावरून सत्ताधारी पक्षाचे सदस्य आणि विरोधी पक्षाचे सदस्य आमने-सामने आले आणि त्यांच्यामध्ये हाणामारी झाली. तुर्कस्तानच्या संसदेमध्ये सत्ताधारी पक्षाचे सदस्य आणि विरोधी पक्षाच्या सदस्यांमध्ये जोरदार हाणामारी झाल्याचं समोर आलं आहे. एका विषयावर चर्चा सुरु असताना सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील काही सदस्यांमध्ये आधी आरोप-प्रत्यारोप आणि शाब्दिक वाद झाला

# भारतात मंकीपॉक्सचा धोका वाढला?

## आरोग्य मंत्री जेपी नड्डांनी आढावा घेत दिले ‘हे’ महत्वाचे निर्देश

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जगभरात अनेक ठिकाणी सध्या मंकीपॉक्स या आजाराची साथ मोठ्या प्रमाणात वाढत आहे. अनेक देशात मंकीपॉक्सची लागण झालेले रुग्ण आढळून आले आहेत. त्यानंतर जागतिक आरोग्य संघटनेने मंकीपॉक्सच्या साथीला जागतिक स्वास्थ्य आणीबाणी घोषित केलं आहे. यानंतर आता अनेक देश अलर्ट झाले आहेत. मंकीपॉक्सच्या साथीची भीती भारतातील लोकांमध्येही आहे.**



त्या पार्श्वभूमीवरच आज केंद्रीय आरोग्य मंत्री जेपी नड्डा यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली. मंकीपॉक्स परिस्थितीचा आढावा त्यांनी घेतला. या आजाराच्या पार्श्वभूमीवर खबरदारीच्या उपाययोजना करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.मंकीपॉक्सच्या आजाराबाबत जागतिक आरोग्य संघटनेने दिलेल्या इशाऱ्यानंतर केंद्र सरकार अलर्ट झालं असून त्याअनुषंगाने उच्चस्तरीय बैठका घेण्यात येत आहेत. तसेच मंकीपॉक्सचा प्रसार रोखण्यासाठी उपाययोजना केल्या जाणार आहेत. केंद्रीय आरोग्य मंत्री जेपी नड्डा यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या बैठकीत सावधगिरी म्हणून सर्व विमानतळ, आणि ग्राउंड क्रॉसिंगवरील आरोग्य युनिट्स तसेच चाचणी प्रयोगशाळांसह आरोग्य सुविधांना सतर्क राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच एखादा मंकीपॉक्सचा रुग्ण आढळून आल्यास तात्काळ उपचार करण्याबाबत सांगण्यात आलं आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने जारी केलेल्या एका निवेदनात म्हटलं की, आज झालेल्या बैठकीत असा निर्णय घेण्यात आलायुनिट्सना सतर्क करणे,आरोग्य सुविधा तयार करणे, मंकीपॉक्सचा एखादा रुग्ण सापडल्यास तात्काळ उपाययोजना करण्यात याव्यात.

### मंकीपॉक्स म्हणजे काय?

केंद्रीय आरोग्य मंत्री जेपी नड्डा यांनी मंकीपॉक्सच्या परिस्थितीचा आणि तयारीचा आढावा घेतला. यावेळी आरोग्यमंत्र्यांनी सांगितलं की, या रोगाचा प्रसार रोखण्यासाठी आणि त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी खबरदारीच्या उपाययोजना केल्या जातील. मात्र, भारतात आतापर्यंत मंकीपॉक्सचे एकही प्रकरण समोर आलेलं नाही.मंकीपॉक्स हा प्रामुख्याने मध्य आणि पश्चिम आफ्रिकेत आढळणारा साथीचा आजार आहे. हा आजार देवीच्या रोगासारखा असतो, पण कमी संसर्गजन्य आहे. मंकीपॉक्स झालेल्या व्यक्तीचा वा प्राण्याचा अगदी नजीकचा संपर्क आला.

# इरफान खानबद्दल बोलताना बॉलीवूड अभिनेता भावुक

बॉलीवूडमध्ये असे काही कलाकार आहेत, ज्यांचे चित्रपटसृष्टीतील योगदान मोठे आहे. इरफान खान हे अशा कलाकारांपैकी एक आहेत. अनेक चित्रपटांतून वेगवेगळ्या भूमिका साकारत त्यांनी चित्रपटसृष्टीत आपले वेगळे स्थान निर्माण केले होते. आता लेखक मनू ऋषी यांनी एका मुलाखतीदरम्यान, इरफान खान यांच्या आठवणींना उजाळा दिला आहे.एका यूट्यूब चॅनेलला दिलेल्या मुलाखतीत अभिनेता आणि लेखक मनु ऋषी यांनी इरफान खान यांच्या आठवणींना उजाळा दिला आहे. इरफान खान यांनी एका डायरेक्टरसाठी कथा लिहिण्याचे सूचवले होते, याची आठवण सांगितली आहे. ते म्हणतात, "एका दिग्दर्शकासाठी मी एक कथा लिहिली होती. जेव्हा दिग्दर्शकाबरोबर माझी भेट झाली, त्यावेळी त्यांनी प्रोजेक्ट देण्याआधी टेस्ट म्हणून मला एक सीन लिहायला सांगितले. मी त्या दिग्दर्शकाला म्हटले की, एक तर तुम्हाला माझ्या कामावर विश्वास ठेवायला लागेल किंवा इरफानने जे सूचवलं आहे, त्यावर विश्वास दाखवायला लागेल.तुम्ही माझे काम पाहिले नाही, नाहीतर तुम्ही असा प्रश्न विचारला नसता. जर मी तुम्हाला एखादा सीन दिग्दर्शित करायला सांगितला, तर तुम्हाला कसे वाटेल? त्यावर दिग्दर्शकाने मला सांगितले की, मी सहा चित्रपट दिग्दर्शित केले आहेत. मी त्याला म्हटले, मी ११ चित्रपटांसाठी कथा लिहिल्या आहेत. तुम्ही माझे काम पाहिले नाही, म्हणून मी नाराज नाही; तर इरफानने सांगितलेल्या गोष्टींवरदेखील तुम्ही विश्वास ठेवला नाही, याचे मला वाईट वाटत असल्याचे मी त्यांना म्हटले."पुढे ते म्हणतात, "त्या रात्री इरफान माझ्याकडे आला आणि मी स्वत:ची बाजू ठामपणे

# अजय देवगणला अभिवादन न केल्याने चित्रपटातून काढलं

'सन ऑफ सरदार २'मधून अभिनेते विजय राज यांना काढण्यात आलं आहे. याप्रकरणी निर्माते व विजय राज वेगवेगळी कारणं सांगत आहेत. अजय देवगणला (AJAY DEVGN) अभिवादन न केल्याने चित्रपटातून काढून टाकण्यात आलं, असा दावा विजय राज यांनी केला आहे, तर वाईट वर्तन आणि महागड्या खोलीची मागणी केल्याने त्यांना चित्रपटातून काढल्याचं निर्मात्यांनी म्हटलं आहे.'पिंकव्हिला'ला दिलेल्या मुलाखतीत निर्माते कुमार मंगत म्हणाले, "होय, हे खरंय आहे आम्ही विजय राज यांना त्यांच्या सेटवरील वागणुकीमुळे चित्रपटातून काढून टाकलं आहे. त्यांनी मोठ्या खोल्या व व्हॅनिटी व्हॅनची मागणी केली. त्यांनी स्पॉट बॉईजसाठी आमच्याकडून जास्त पैसे मागितले. त्यांच्या स्पॉट बॉयला एका दिवसाचे २० हजार दिले जात होते, जे खूप जास्त आहेत. यूके महागडे ठिकाण आहे आणि शूटिंगदरम्यान प्रत्येकाला स्टँडर्ड खोल्या देण्यात आल्या होत्या, पण त्यांनी प्रीमियम सूटची मागणी केली. आम्ही त्यांना खर्चाची परिस्थिती समजावून सांगण्याचा प्रयत्न केला पण त्यांनी नकार दिला. तसेच ते उद्धटपणे म्हणाले, 'तूच माझ्याकडे आलास, मी तुझ्याकडे काम मागायला आलो नाही'. त्यांचं असं वागणं दिवसेंदिवस वाढतच चाललं होतं. त्यांनी तीन कर्मचाऱ्यांच्या प्रवासासाठी दोन कारची मागणी केली होती," असा दावाही मंगत यांनी केला. याप्रकरणी विजय राज यांनी वेगळंच कारण सांगितलं आहे. पहिल्या दिवशी सेटवर अजय देवगणला अभिवादन न केल्यामुळे चित्रपटातून काढून टाकल्याचा दावा त्यांनी केला. "मी वेळेआधीच सेटवर पोहोचलो होतो.



# ट्विंकल खन्नाची संतप्त पोस्ट

कोलकातामध्ये ट्रेनी डॉक्टरवर झालेल्या बलात्कार प्रकरणामुळे देशात सध्या संतापाचे वातावरण पाहायला मिळत आहे. बॉलीवूडमधील अनेक कलाकारांनी यावर संताप व्यक्त केला आहे. कंगना रणौत, आलिया भट्ट, विजय वर्मा, परिणीती चोप्रा, करीना कपूर खान या कलाकारांनी या घटनेवर व्यक्त होत संताप व्यक्त केला आहे. आता ट्विंकल खन्नानेदेखील सोशल मीडियावर संताप व्यक्त केला आहे.ट्विंकल खन्नाने इन्स्टाग्रामच्या अधिकृत अकाउंटवरून या घटनेवर भाष्य केले आहे. स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्टला तिने इन्स्टाग्राम पोस्ट करीत लिहिले की, मला ज्या लहानपणी गोष्टी शिकवल्या जात होत्या, त्याच गोष्टी मी माझ्या मुलीला शिकवत आहे. अभिनेत्री ट्विंकल खन्नाने आपल्या पोस्टमध्ये लिहिले, "या पृथ्वीवरील आणि देशातील ५० वर्षे आणि मी माझ्या मुलीला त्याच गोष्टी शिकवत आहे, ज्या लहान असताना मला शिकविल्या गेल्या होत्या. एकटी पार्कमध्ये जाऊ नको, शाळेत जाऊ नको, समुद्रकिनाऱ्यावर जाऊ नको.



# अफेअर अन् लग्न

प्यार का पंचनामा' फेम लोकप्रिय बॉलीवूड अभिनेत्री सोनाली सेहगल आई होणार आहे. वर्षभरापूर्वी सोनालीने व्यावसायिक बॉयफ्रेंड आशीष सजनानीशी लग्न केलं. आता तिने गूड न्यूज दिली आहे. सोनालीने इन्स्टाग्रामवर फोटो पोस्ट करून याबद्दल चाहत्यांना माहिती दिली आहे.१५ ऑगस्ट रोजी टीव्हीवरील 'गोपी बहू' म्हणजेच देवोलिना भट्टाचार्जीने प्रेग्नेंसीची घोषणा केली होती. आता एका दिवसानंतर बी-टाऊनची प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली सहगल हिने आनंदाची बातमी दिली आहे. लग्नाच्या एक वर्षानंतर सोनाली आई होणार आहे.३५ वर्षीय सोनाली सहगलने इन्स्टाग्रामवर फोटो पोस्ट घोषणा करून गूड न्यूज दिली आहे. तिने तीन फोटो शेअर केले आहेत, ज्यात एका फोटोमध्ये तिचा बेबी बंप दिसतोय आणि ती काहीतरी खाताना दिसत आहे. तर तिच्या शेजारी तिचा पती बिअरची बाटली आणि हातात एक बाळाच्या दुधाची बाटली धरलेला दिसत आहे. अभिनेत्रीच्या समोर बेडवर चिप्स, बिस्किट व पुस्तकं दिसत आहेत.सोनालीने कॅप्शनमध्ये लिहिलं, "बिअरच्या बाटल्यांपासून बाळाच्या दुधाच्या बाटलीपर्यंत आशिषचे आयुष्य बदलणार आहे. माझ्या बाबतीत काही गोष्टी तशाच राहतील. आधी मी माझ्यासाठी खायचे आता दोघांसाठी खाते. दुसरीकडे समशेर (सोनालीचा श्वान) चांगला मोठा भाऊ होण्यासाठी नोट्स काढत आहे. मी खूप कृतज्ञ व आनंदी आहे. प्रार्थना करा." सोनालीच्या बाळाचा जन्म डिसेंबरमध्ये होईल असंही तिने सांगितलं.सोनाली सहगलने ७ जून २०२३ रोजी बिझनेसमन आशिष सजनानीशी लग्न केलं. या जोडप्याने पाच वर्षे एकमेकांना गुपचूप डेट केलं होतं. त्यानंतर मुंबईत लग्नगाठ बांधली.

# जिनिलीयाचा आनंद गगनात मावेना!

'बिग बॉस मराठी'चा पाचवा सीझन सध्या दणक्यात सुरू आहे. यंदाचा सीझन पहिल्यांदाच अभिनेता रितेश देशमुख होस्ट करत आहे. यापूर्वीचे चार सीझन महेश मांजरेकरांनी होस्ट केले होते. त्यामुळे रितेश यंदाचा सीझन कसा सांभाळणार याकडे प्रत्येकाचं लक्ष लागलेलं होतं. अखेर समोर आलेल्या टीआरपीच्या आकडेवारीनुसार 'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या सीझनने रेकॉर्डब्रेक टीआरपी आणला आहे.'बिग बॉस मराठी'चं पाचवं पर्व २८ जुलैपासून सुरू झालेलं आहे. या कार्यक्रमाने तिसऱ्याच आठवड्यात ३.२ TVR एवढा टीआरपी आणला आहे. विशेषत: वीकेंडला म्हणजेच 'बिग बॉस मराठी'च्या भाऊच्या धक्क्याला यंदा सर्वाधिक टीआरपी मिळत आहे. कार्यक्रमाला हा ऐतिहासिक टीआरपी मिळाल्यानंतर रितेश देशमुखचं त्याची पत्नी जिनिलीयाने तोंडभरून कौतुक केलं आहे. जिनिलीयाने 'बिग बॉस मराठी'ने ऐतिहासिक टीआरपी रचल्याची पोस्ट शेअर करत नवऱ्यासाठी खास मेसेज लिहिला आहे. अभिनेत्री ( GENELIA DESHMUKH ) लिहिते, "मला जेव्हा तू सांगितलंस की, यावर्षी तू 'बिग बॉस मराठी'चा सीझन होस्ट करणार आहेस... अगदी त्या क्षणाला मला खात्री होती की, हा शो सगळे रेकॉर्ड्स ब्रेक करेल. प्रिय नवरोबा मला तुझा खूप अभिमान वाटतो आणि तुझं खूप खूप अभिनंदन! 'बिग बॉस मराठी'ची संपूर्ण टीम, 'कलर्स मराठी' वाहिनी तुम्हाला सुद्धा खूप शुभेच्छा! येत्या काळात अशीच प्रगती करत राहा." दर वीकेंडला रितेश देशमुख घरात चुकीचं वर्तन करणाऱ्या सदस्यांची शाळा घेत असल्याचं पाहायला मिळत आहे.



# आम्ही जे काही कठोर पाऊल उचलले..!

## कठोर पावलांमुळेच श्रेयस-इशान स्पर्धेत सहभागी : जय शाहा

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**बीसीसीआयने सर्व केंद्रीय करार असलेल्या खेळाडूंना देशांतर्गत क्रिकेटमध्ये खेळणे अनिवार्य केले आहे. ज्यामुळे जे क्रिकेटपटू तंदुरुस्त आहेत आणि राष्ट्रीय कर्तव्यावर नाहीत त्यांना देशांतर्गत स्पर्धा खेळावी लागत आहे. काही दिवसापूर्वी बोर्डाच्या या सूचनांचे पालन न केल्याने इशान-श्रेयसला केंद्रीय करारातून वगळण्यात आले होते. कारण ते तंदुरुस्त असूनही देशांतर्गत सामने खेळले नाहीत. आता हे दोघेही देशांतर्गत खेळताना दिसणार आहेत. यावर बीसीसीआयचे सचिव जय शाह म्हणाले, कठोर कारवाईमुळे दोन्ही खेळाडू देशांतर्गत स्पर्धेत सहभागी झाले आहेत.**





आता श्रेयस अय्यर आणि इशान किशन हे दोघेही आगामी दुलीप ट्रॉफीचा भाग आहेत, जी ५ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. बीसीसीआयच्या कठोर कारवाईमुळे दोन्ही खेळाडूंनी हा निर्णय घेतल्याचे बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी म्हटले आहे. ते म्हणाले, 'दुलीप ट्रॉफी संघाकडे बघितले तर रोहित आणि विराट व्यतिरिक्त इतर सर्व खेळाडू खेळताना दिसतील. आम्ही उचललेल्या कठोर पावलांमुळेच श्रेयस अय्यर आणि इशान किशन दुलीप ट्रॉफी खेळत आहेत.'जय शाह पुढे म्हणाले, 'आम्ही थोडे कठोर आहोत. रवींद्र जडेजा जखमी झाला, तेव्हा मीच त्याला फोन करून देशांतर्गत सामने खेळायला सांगितले. आता हे निश्चित झाले आहे की जो दुखापतग्रस्त आहे, तो देशांतर्गत क्रिकेटमध्ये फिटनेस सिद्ध केल्यानंतरच भारतीय संघात सामील होऊ शकतो." विराट कोहली, रोहित शर्मा, हार्दिक पंड्या आणि जसप्रीत बुमराह यांना वर्कलोड मॅनेजमेंट अंतर्गत विश्रांतीची परवानगी देण्यात आली आहे.आता भारताच्या पुढील मालिकेतील पहिला सामना महिनाभरानंतर होणार आहे. १९ सप्टेंबरपासून बांगलादेशविरुद्ध दोन सामन्यांची कसोटी मालिका खेळवली जाणार आहे. बीसीसीआयचे सचिव पुढे म्हणाले, 'विराट आणि रोहितला देशांतर्गत क्रिकेट खेळायला सांगून त्यांच्यावर अधिक भार टाकण्यात काही अर्थ नाही. कारण त्यामुळे त्यांना दुखापत होण्याचा धोका आहे. तुम्ही जर इंग्लंड-ऑस्ट्रेलियाकडे पाहिले, तर तुमच्या लक्षात येईल की त्यांचा एकही स्टार खेळाडू देशांतर्गत क्रिकेट खेळत नाही. त्यामुळे आपणही आपल्या खेळाडूंशी आदराने वागले पाहिजे.'आता श्रेयस अय्यर आणि इशान किशन हे दोघेही आगामी दुलीप ट्रॉफीचा भाग आहेत, जी ५ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. बीसीसीआयच्या कठोर कारवाईमुळे दोन्ही खेळाडूंनी हा निर्णय घेतल्याचे बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी म्हटले आहे. ते म्हणाले, 'दुलीप ट्रॉफी संघाकडे बघितले तर रोहित आणि विराट व्यतिरिक्त इतर सर्व खेळाडू खेळताना दिसतील. आम्ही उचललेल्या कठोर पावलांमुळेच श्रेयस अय्यर आणि इशान किशन दुलीप ट्रॉफी खेळत आहेत.'जय शाह पुढे म्हणाले, 'आम्ही थोडे कठोर आहोत. रवींद्र जडेजा जखमी झाला, तेव्हा मीच त्याला फोन करून देशांतर्गत सामने खेळायला सांगितले. आता हे निश्चित झाले आहे की जो दुखापतग्रस्त आहे, तो देशांतर्गत क्रिकेटमध्ये फिटनेस सिद्ध केल्यानंतरच भारतीय संघात सामील होऊ शकतो." विराट कोहली, रोहित शर्मा, हार्दिक पंड्या आणि जसप्रीत बुमराह यांना वर्कलोड मॅनेजमेंट अंतर्गत विश्रांतीची परवानगी देण्यात आली आहे.

### खेळाडूंशी आदराने वागले पाहिजे

आता भारताच्या पुढील मालिकेतील पहिला सामना महिनाभरानंतर होणार आहे. १९ सप्टेंबरपासून बांगलादेशविरुद्ध दोन सामन्यांची कसोटी मालिका खेळवली जाणार आहे. बीसीसीआयचे सचिव पुढे म्हणाले, 'विराट आणि रोहितला देशांतर्गत क्रिकेट खेळायला सांगून त्यांच्यावर अधिक भार टाकण्यात काही अर्थ नाही. कारण त्यामुळे त्यांना दुखापत होण्याचा धोका आहे. तुम्ही जर इंग्लंड-ऑस्ट्रेलियाकडे पाहिले, तर तुमच्या लक्षात येईल की त्यांचा एकही स्टार खेळाडू देशांतर्गत क्रिकेट खेळत नाही. त्यामुळे आपणही आपल्या खेळाडूंशी आदराने वागले पाहिजे.' काही दिवसापूर्वी बोर्डाच्या या सूचनांचे पालन न केल्याने इशान-श्रेयसला केंद्रीय करारातून वगळण्यात आले होते. कारण ते तंदुरुस्त असूनही देशांतर्गत सामने खेळले नाहीत. आता हे दोघेही देशांतर्गत खेळताना दिसणार आहेत. यावर बीसीसीआयचे सचिव जय शाह म्हणाले.

# झिम्बाब्वे वर्ल्डकप आयोजनासाठी तयार

## बांगलादेशातील परिस्थितीमुळे यजमानपदासाठी प्रस्ताव

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महिला टी-२० विश्वचषक यंदा बांगलादेशमध्ये होणार आहे. मात्र, बांगलादेशातील सरकारविरोधी निदर्शनांमुळे सुरक्षेच्या कारणास्तव टी-२० विश्वचषकाचे ठिकाण बदलले जाण्याची शक्यता आहे. महिला टी-२० विश्वचषक ३ ऑक्टोबरपासून आयोजित केला जाणार आहे. अशा परिस्थितीत यंदाच्या महिला टी-२० विश्वचषकाच्या यजमानपदाचा दावा अशा एका देशाने केला आहे. ज्याच्या नावाची जोरदार चर्चा सुरु आहे. हा देश दुसरा कोणी नसून झिम्बाब्वे आहे.**



झिम्बाब्वे हा यजमानपदासाठी प्रमुख पर्याय म्हणून पुढे आला आहे. युएईकडेही पर्याय म्हणून पाहिले जात आहे. मंगळवारी, २० ऑगस्ट रोजी आयसीसी बोर्ड याबाबत निर्णय घेऊ शकते.झिम्बाब्वेने गेल्या काही वर्षांत (२०१८ आणि २०२३) दोन एकदिवसीय विश्वचषक पात्रता फेरीचे यशस्वी आयोजन केले आहे. त्यानंतर, झिम्बाब्वेने स्वतःला मोठ्या क्रिकेट स्पर्धांचे संभाव्य ठिकाण म्हणून स्थापित केले आहे. झिम्बाब्वेने २००३ मध्ये दक्षिण आफ्रिका आणि केनियासह शेवटच्या वेळी विश्वचषकाचे आयोजन केले होते. तेव्हापासून झिम्बाब्वेसमोर अनेक आव्हाने आहेत. रॉबर्ट मुगाबे यांच्या राजवटीचा समावेश, अति चलनवाढ, ज्यामुळे त्यांना महत्त्वाच्या क्रिकेट स्पर्धांपासून दूर ठेवण्यात आले.झिम्बाब्वेने अलिकडच्या वर्षांत क्रिकेट जगतात पुनरागमन केले आहे आणि आता महिला टी-२० विश्वचषक आयोजित करण्यास उत्सुक आहे. मात्र, झिम्बाब्वेचा महिला क्रिकेट संघ कधीही विश्वचषकात सहभागी झालेला नाही, आणि यंदाही स्पर्धेत सहभागी होणार नाही.

### झिम्बाब्वेमध्ये आयोजन केले जाऊ शकते?

असे असले तरी झिम्बाब्वेने नवीन यजमान म्हणून स्वतःला सिद्ध करण्यास उत्साह दाखवला आहे. झिम्बाब्वे २०२६ मध्ये नामिबियासोबत पुरुष अंडर-१९ विश्वचषक आणि २०२७ मध्ये दक्षिण आफ्रिका आणि नामिबियासोबत एकदिवसीय विश्वचषक सह-यजमान असेल. दरम्यान, झिम्बाब्वे क्रिकेट आणि स्थानिक सरकार व्हिक्टोरिया फॉल्स आणि मुतारे येथे काम करत आहेत.सध्या, झिम्बाब्वे हरारे स्पोर्ट्स क्लब आणि बुलावायो येथील क्वीन्स स्पोर्ट्स क्लब २०२४ महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी संभाव्य यजमान म्हणून मैदानात उतरत आहे. या मैदानांवर नुकतेच २०२३ च्या विश्वचषक पात्रता सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. ऑक्टोबरमधील झिम्बाब्वेचे हवामान देखील या स्पर्धेसाठी अनुकूल मानले जाते, कारण त्यावेळ देशात अधिक गरम असते आणि पावसाची शक्यता कमी असते.भारत आणि श्रीलंकेने हवामानामुळे यजमानपद न भूषवण्याचा निर्णय घेतला आहे. झिम्बाब्वेला आशा आहे की त्यांनी आयोजित केलेल्या स्पर्धेचा खर्च यूएईच्या तुलनेत कमी असेल.